**मौजा बाभुळखेडा येथील खसरा क्र. ७४/१, आराजी ३६४६.७० चौ. मी. जागा चर्मकार सेवा संघ, नागपूर यांना नाममात्र दराने देण्यास मान्यता देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक- नासुप्र-२०१९/प्र.क्र.०३/नवि-२६**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक :- ८ मे, २०२६.**

वाचा :- १) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक- नासुप्र-२०१९/प्र.क्र.०३/नवि-२६, दि. २० नोव्हेंबर,२०२३.

२) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांचे पत्र क्र.संपत्ती विभाग/२९१२, दि. ३० सप्टेंबर, २०२५.

३) नागपूर सुधार प्रन्यास विश्वस्त मंडळाचा सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ३/१२३३, दि. २१ ऑगस्ट , २०२५

**प्रस्तावना:-**

मौजा-बाभुळखेडा खसरा क्र. ७४/१, आराजी ३६४६.७० चौ.मी. जागा चर्मकार सेवा संघ, नागपूर या सेवाभावी सामाजिक संस्थेस थेट वाटप करण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये नागपूर सुधार प्रन्यास जमीन विनियोग अधिनियम १९८३ मधील नियम ७ (३) प्रमाणे निर्धारीत मुल्य अदा करण्याच्या अटीवर उपरोक्त जागा थेट वाटपाद्वारे देण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता, ही अट शिथील करून चर्मकार सेवा संघ, नागपूर यांना मौजा-बाभुळखेडा खसरा क्र. ७४/१, आराजी ३६४६.७० चौ.मी. जागा नाममात्र शुल्काने देण्यास संदर्भ क्र. ३ यथील ठरावानुसार नागपूर सुधार प्रन्यास विश्वस्त मंडळाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांनी संदर्भ क्र. २ येथील प्रस्तावानुसार नागपूर सुधार प्रन्यास जमीन विनियोग नियम १९८३' मधील नियम ७(२), ७(३) ला २६ अंतर्गत शासनास प्राप्त अधिकारानुसार शिथिलता प्रदान करण्याबाबत शासन मान्यता देण्याची विनंती केली होती. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. नगरविकास विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १ मधील “नियम ७ (३) प्रमाणे निर्धारीत मुल्य अदा करण्याच्या अटीच्या अधीन राहून” ही अट रद्द करण्यात येत आहे.

२. नागपूर सुधार प्रन्यास विश्वस्त मंडळ ठराव क्र. ३/१२३३ दि. २१.०८.२०२५ नुसार श्री संत रविदास महाराजांचे स्मारक व सांस्कृतिक भवन बांधण्यासाठी मौजा बाभुळखेडा येथील खसरा क्र. ७४/१, आराजी ३६४६.७० चौ. मिटर ही जागा चर्मकार सेवा संघ, नागपूर यांना नाममात्र दराने देण्यास नागपूर सुधार प्रन्यास जमीन विनियोग नियम १९८३ मधील नियम ७(२), ७ (३) ला नियम २६ अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार शिथिलता देण्यास पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अट क्र.१ - सदर जागेच्या वाटपामुळे मा.उच्च न्यायालयात दाखल कोणत्याही न्यायालयीन प्रकरणामध्ये हस्तक्षेप होत नाही अथवा मा.न्यायालयाचा अवमान होत नाही याची संपुर्ण खात्री करुनच जागेचे वाटप करावे, याची सर्व जबाबदारी सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांची राहील.

अट क्र.२- ज्या प्रयोजनाकरिता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये जागेचे वाटप करण्यात आले आहे. केवळ त्याच प्रयोजनाकरिता वाटप केलेल्या जागेचा उपयोग करण्यात यावा.

अट क्र.३- जागेची आवश्यकता नसल्यास सदर जागा चर्मकार सेवा संघ, नागपूर संस्थेने नागपूर सुधार प्रन्यासला परत करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०५०८१२३१५६२७२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A94EF1B631F4673B829AC9ADBEB5B0DDABD086A7544E3FDF47CD7A011FF7EA40, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2026.05.08 12:33:51 +05'30'

**(विद्या हम्पय्या)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (नवि-२) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
६. चर्मकार सेवा संघ, नागपूर, द्वारा महाव्यवस्थापक, नागपूर सुधार प्रन्यास,नागपूर
७. निवडनस्ती, कार्यासन नवि-२६, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई